महाराष्ट्र वाढीव जमिन महसूल व विशेष
आकारणी अधिनियम १९७४

---

अकृषिक आकारणीतून सूट दिलेल्या
जमिनीबाबत वाढीव जमिन महसूलांतून
सूट मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक एनएए १०८५- २७२९१-(१४) ल-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २१ नोव्हेंबर १९८५.

परिपत्रक

महाराष्ट्राच्या अविकसित भागात नवीन कारखाने उभारण्यासाठी तसेच अस्तित्वात असलेल्या कारखान्यांचे विस्तृतीकरण करण्यासाठी उद्योजकांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक एनएए २३७२ त१८ ९७ सी- दोन दिनांक २८ डिसेंबर १९७२ अन्वये शासनाने महाराष्ट्र जमिन महसूल संहितेच्या कलम ४४ मधील शर्तींचा वापर करून उद्योजकांना अकृषिक आकारणीतून काही ठराविक काळासाठी सूट जाहीर केली आहे. ही सूट मिळविण्यासाठी उद्योजकांना महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ मर्यादित मुंबई यांनी दिलेले " पात्रता प्रमाणपत्र " दाखल करावे लागते. शासनाच्या उक्त निर्णयाप्रमाणे ज्या उद्योजकांना जमिनीबाबत अकृषिक आकारणीतून ज्या कालावधीसाठी सूट दिली जाते, त्या कालावधीत उद्योजकांकडून महाराष्ट्र वाढीव जमीन महसूल व विशेष आकारणी अधिनियम १९७४ च्या तरतुदीनुसार वाढीव जमिन महसूल आकारावा किंवा कसे असा प्रश्न शासनापुढे उपस्थित करण्यात आला होता.

२ या प्रश्नाची कायदेशीर बाजू पडताळून पाहिली असता शासनास असा सल्ला देण्यात आला आहे. की महाराष्ट्र वाढीव जमीन महसूल व विशेष आकारणी अधिनियम १९७४ च्या तरतुदीनुसार आकारण्यात येणारा वाढीव जमिन महसूल हा महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ च्या तरतुदीनुसार आकारण्यात येणाऱ्या जमिन महसूलावर अतिरिक्त आहे. महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ च्या कलम २( १९) मध्ये जमिन महसूलाची जी व्याख्या दिली आहे. त्याप्रमाणे जमिन महसूलामध्ये अकृषिक साऱ्याचाही समावेश होतो. यास्तव जर एखाद्या जमिनीबाबत शासनाने जमिन महसूलात सूट ( एक्झमशन) दिली असेल तर त्या जमिनीबाबत महाराष्ट्र वाढीव जमिन महसूल व विशेष आकारणी अधिनियम १९७४ च्या तरतुदी लागू होत नाहीत.

३ तेव्हा वरील परिस्थिती याबाबत असे स्पष्टीकरण करण्यात येत आहे की ज्या जमिनीबाबत अकृषिक आकारणीतून सूट ( एक्झमशन ) दिलेली असेल त्या जमिनीवर

पान दोन पहा...

महाराष्ट्र वाढीव जमीन महसूल व विशेष आकारणी अधिनियम, १९७४ च्या तरतुदी प्रमाणें वाढीव जमीन महसूल आकारण्यांत येवू नये. तसेच वाढीव जमीन महसूल आकारणीस ही सूट ज्या कालावधीसाठी अधिक आकारणी करण्यांत येणार नाही तेवढ्याच काळा पर्यंत मर्यादित राहील. सर्व जिल्हाधिका-यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संबंधित अधिका-यांना यासंबंधी योग्य त्या सूचना द्याव्यात.

४ हे परिपत्रक वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर १०८४-८५-व्यय-१६ दिनांक २९-८-१९८५ ने काढण्यांत आले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

रा.बा. आडिवरेकर  
कार्यासन अधिकारी,  
महसूल व वन विभाग.